नि. फौ.ख.क्र.५/२०२६
शासन वि. अमोल
नि.क्र.१५

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१**

नावः मंगेश उमराव मेश्राम,
वयः ३२ वर्ष, धंदाः मजूरी,
पत्ताः आमडी , त. पारशिवनी जि. नागपूर

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र.१ याचा सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्री. एस. व्ही. तलमले यांच्यामार्फत शपथेवर सुरुः**

१. राईबाई मेश्राम माझी आई व महेंद्र माझा भाऊ आहे. घटना दि. ३१/१०/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता महादुलाकडून येतांना दहेगाव फाट्यावर घडली. माझी आई व भाऊ मोटारसायकल क्र. एम. एच ४० बी व्ही ८६९९ ने महादुलावरुन आमडी येथे येत होते. माझा भाऊ महेंद्र हा मोटारसायकल चालवित होता. मला माझ्या मामीने फोनकरुन अपघाताबाबत माहिती दिली. त्यानंतर मी ग्रामीण रुग्णालय पारशिवनी येथे आलो. माझी आई अपघात मरण पावल्याचे समजले. माझा भाऊ महेंद्र यास डोक्याला, हाताला, पायाला मार होता त्याला मेडिकल येथे रेफर केले होते. अपघात दोन मोटारसायकलचा झाला होता. दुसरी मोटारसायकल पल्सर होती. घटनेची तक्रार मी नोंदविली. आता मला तक्रार दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि. क्र. १६** देण्यात येते. आता छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि. क्र. १७** देण्यात येते. चौकशी केली असता पल्सर मोटारसायकल आरोपी अमोल राठोड चालवित होता. मी अमोल राठोड यास पाहिले नव्हते.
सरतपास पूर्ण

**आरोपीतर्फे श्री. एस. एस. परदेशी वकील साहेब यांचे तर्फे उलटतपास शपथेवर सुरु**

२. हे म्हणणे खरे आहे की, दहेगाव फाटा हा हायवे रोडला लागून आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या भावाच्या मोटारसायकलवर माझी आई व ज्योत्सना माटे असे होते. रिपोर्ट देता वेळेस मी ज्या मोटारसायकलने अपघात झाला ती पल्सर मोटारसायकल होती असे सांगितले नव्हते. माझ्या भावाकडे मोटारसायकल चालवायचा परवाना होता किंवा काय मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी नुकसान भरपाई मिळण्याकरिता फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, पल्सर मोटारसायकल आरोपी अमोल राठोड चालविता होता असे चौकशीत तुम्हाला माहीत पडले नाही .हे म्हणणे खरे नाही की, माझ्या भावाच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2026.04.20 13:24:03 +0530

**(जी.ओ. वानखडे)**

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

समक्ष

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2026.04.20 13:24:11 +0530

**(जी.ओ. वानखडे)**

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

दिनांकः २०/०४/२०२६